दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे

RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : ०८ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353


## राज्याचे कॉम्प्रेस्ड 'बॉयोगॅस' धोरण जाहीर

### अंमलबजावणीसाठी ५०० कोटींची तरतूद; राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** कचरा साठल्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या आणि पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, २०२६ राबवण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी २०२६-२७ या वर्षात ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यामुळे शहरांतील कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणे शक्य होणार आहे.

कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस धोरणाच्या अंतर्गत कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या गरजेनुरूप वापरण्यायोग्य गॅस उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. असे प्रकल्प पीपीपी व हायब्रिड अँन्युएटी तत्त्वावर राबवण्यात येतील. हे धोरण कचऱ्याचे ऊर्जा व खतामध्ये रूपांतर करून रोजगार व संपत्ती निर्माण करणारे आहे.

**सार्वजनिक आरोग्यासाठी हितकारी**

नागरी भागातील कचऱ्याचे विलगीकरण, संकलन, प्रक्रिया आणि स्वच्छ ऊर्जेत रूपांतर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे धोरणाचा उद्देश आहे. या धोरणाद्वारे



कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या उत्पादनाला आणि घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेवरील भार कमी होईल. सार्वजनिक आरोग्यात सुधारणा व हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी झाल्याने वातावरणाची गुणवत्ता वाढेल. जमिनीचा ऱ्हास, वायू प्रदूषण, नागरी कचरा आणि कृषी कचरा स्त्रोतांवर कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस उपक्रमांना प्रोत्साहन देणे, धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

**सार्वजनिक- खासगी भागीदारी, हायब्रिड अँन्युटी मॉडेल**

राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव तर जिल्हास्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील. या समित्यांमार्फत प्रकल्पांची निवड, समन्वय, अंमलबजावणी आणि संनियंत्रण केले जाईल. प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण २०२६ आणि हायब्रीड अँन्युटी मॉडेलनुसार राबवण्यात येणार आहे.

**प्रकल्पासाठी २०० टन प्रतिदिन क्षमेतचा निकष**

कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस प्रकल्पांसाठी किमान २०० टन प्रतिदिन क्षमतेचा निकष ठेवण्यात आला आहे. हे प्रकल्प स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि उपक्रम, खासगी विकासक आणि तेल व वायू वितरण कंपन्यांमार्फत ग्रीनफिल्ड किंवा ब्राऊनफिल्ड स्वरूपात राबवता येतील. ज्या ठिकाणी पुरेसा कचरा उपलब्ध नाही तिथे क्लस्टर-आधारित प्रकल्प तसेच कृषी उत्पादक संस्थांच्या मदतीने कृषीतील टाकाऊ घटकांचे एकत्रीकरण करून प्रकल्प उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे.


## कर्तव्यदक्ष पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावे –प्रतीक्षा वासनिक

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अकोला :**

संकल्प बहुद्देशीय संस्था अकोला यांच्यातर्फे कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शेगांव येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील आपल्या कार्यास एकनिष्ठ असणाऱ्या,

सामाजिक, पोलीस, सरपंच,कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, संस्था, प्रशासकीय, कला व अन्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांना हा कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा मे महिन्यात शेगांव येथे पार पडणार आहे अशी माहिती कार्यक्रम मुख्य आयोजक प्रतीक्षा वासनिक यांनी दिली. पुरस्कार



प्रस्ताव अधिक माहितीसाठी +917385792660 वर सपंर्क करावा असें आवाहन प्रतीक्षा वासनिक यांनी केले आहे.

## शहरांमधील पेट्रोल पंपावर 24 तास सेवा देण्यात यावी

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** स्थानिक वाशिम शहरातील अनेक पेट्रोल पंपावर पेट्रोल मिळत नसल्यामुळे दिनांक 23 एप्रिल 20 26 रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन कळविण्यात आले की,वाशिम शहरांमधील पेट्रोल पंपावर रात्री बाराच्या नंतर पेट्रोल व डिझेल साठी वाहन धारकांना पेट्रोल व डिझेल पेट्रोल पंपावरील कर्मचारी नाकारतात, त्या विरोधात मनसे जिल्हा अध्यक्ष राजू पाटील किड्से यांच्या मार्गदर्शनात मनसे जिल्हा सचिव तथा वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे यांच्या नेतृत्वात वाशिमचे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले की वाशिम शहरातील पेट्रोल पंपावर सुरळीत 24




तास इंधन सेवा देण्यात यावी.अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक भूमिका घेईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष वाशिम विठ्ठल राठोड शहर उपाध्यक्ष वाशिम आकाश लोलप महिला तालुका अध्यक्ष पुष्पाताई रवंदळे इत्यादी होते.

## श्री गौरक्षण संस्थान अकोला यांच्या मदतीने गोमातेला निवारा

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** सारकिन्ही,,जय सेवालाल गौरक्षण संस्थान जनुना तालुका बार्शी टाकळी जिल्हा अकोला. येथे जागेचे स्थलांतर करण्यात आले. संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची बिकट असल्यामुळे आणि गोशाळेमध्ये क्षमतेपेक्षा जास्त गोवंश गोमाता असल्यामुळे गोमातेचा निवारा लहान पडत होता गोमातेची निवाऱ्याची व्यवस्था पाहून श्री गौरक्षण संस्थांचे संस्थापक अध्यक्ष यांनी मागील चार ते पाच पिढ्यांपासून गोमातेची गोवंशाची मनोभावे प्रामाणिकपणे निष्ठेने सेवा केली असे गो भक्त गोसेवा यांनी जय सेवालाल गौरक्षण संस्थांची चारापाणी आणि निवाऱ्याची व्यवस्थेची बातमी



महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक मध्ये प्रकाशित झाल्यामुळे आणि स्वच्छ गोभक्तांपर्यंत ही बातमी पाहून स्वयंस्फूर्तीने गोशाळेचे परिस्थिती प्रत्यक्ष पाहून व शाळेला खरंच एका निवाऱ्यांची आवश्यकता आहे. म्हणून सदर गोशाळेला 30 बाय 140 फुटांचं मजबूत चिरकाल टिकेल अशा पद्धतीचं लोखंडी टिन शेड .श्री गौरक्षण संस्थांनी संपूर्ण बांधकामाश बांधून दिल्यामुळे व गो संवर्धन निवाऱ्यांची कायमस्वरूपी व्यवस्था करून दिली. यापूर्वी लहान वासराना गर्दीत चेंगरा चेंगरी होत होते आता.गोमाता गोवंशाला एक आगळा वेगळा सुख आनंद कोणत्याही प्रकारची दुखापत जनावरांना होणार नाही याची काळजी घेतली.एकमेकांना इजा होणार नाही . अशा पद्धतीची व्यवस्था श्री गौरक्षण संस्थांननी कायमस्वरूपी उपलब्ध करून दिल्या मुळे केल्यामुळे संस्थेच्या वतीने तथा तमाम पंचक्रोशीतील जनतेच्या वतीने त्यांचे धन्यवाद आणि मनापासून आभार संस्थेचे सर्व संचालक संस्थापक अध्यक्ष यांनी आभार मानले आणि गोमाता आपलं सर्व मनोकामना पूर्ण करो असा आशीर्वाद सदैव तुम्हाला व तुमच्या सर्व परिवारांना सदैव मिळत राहो अशी मनोभावे गोमातेच्या चरणी प्रार्थना करतो.

आणि सच्चा गोभक्तांना गो सेवकांना या गोमातेचा आशीर्वाद मिळो अशी प्रार्थना.

## गटबाजी संपवून एकसंघ रिपब्लिकन पक्ष वाढविण्याच्या आवाहनाला समाजातून मोठा प्रतिसाद - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष देशभर पोहोचविला आहे. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट आहेत. राज्याबाहेर मात्र गटबाजी नाही. देशभरात 28 राज्य आणि 8 केंद्रशासित प्रदेशात मी रिपब्लिकन पक्ष पोहोचविला असून तिथे इतर कोणतेही रिपब्लिकन गट नाहीत.त्यामुळे एकच रिपब्लिकन पक्ष एकसंघपणे मजबूत उभा रहावा यासाठी रोज नवे गट स्थापन करणे बंद केले पाहिजे. नवे रिपब्लिक गट स्थापन करण्यापेक्षा एकाच रिपब्लिकन पक्षात आपले छोटे मोठे गट विसर्जित करून व्यापक मजबूत एकसंघ रिपब्लिकन पक्ष उभा केला पाहिजे



असे आपण आवाहन केल्यानंतर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात समाजातून प्रतिसाद मिळत आहे.रिपब्लिकन सेने चे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांनी आज त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह माझ्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केल्याची अधिकृत घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली. यापूर्वी आपल्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे यांनी आपला गट रिपब्लिकन पक्षात विलीन करून त्यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला आहे. राज्यात अनेक ठिकाणी छोट्या संघटना आणि रिपब्लिकन गट हे रिपब्लिकन पक्षाची एकजूट व्हावी या विचाराचे आहेत.एकसंघ रिपब्लिकन पक्षासाठी अनेक गट माझ्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात विलीन होण्यास मोठा प्रतिसाद देतील असा मला विश्वास आहे असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

वेगळा नवीन रिपब्लिकन गट काढून गटबाजी वाढवण्यापेक्षा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात विलीन होऊन एकसंघ रिपब्लिकन पक्ष मजबुत उभा केला पाहिजे. त्यासाठी आपण केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर अतुट विश्वास ठेवुन रिपब्लिकन पक्षात प्रवेश करीत असल्याचे सांगत रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांनी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षात जाहीर प्रवेश केला. केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले




यांचे आशिर्वाद घेवुन त्यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आज रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केला. रिपब्लिकन पक्षात केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांचे स्वागत केले. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे ; राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे; राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खांबलकर; मुंबई कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड; मुंबई सरचिटणीस विवेक पवार; जिल्हा अध्यक्ष प्रकाश जाधव, दयाळ बहादुर आदि अनेक मान्यवर उपस्थित होते.

रिपब्लिकन सेनेचे मुंबई अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांच्यासोबत अनेक कार्यकर्त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. यावेळी रिपब्लिकन सेनेचे मायनॉरिटी मुंबई अध्यक्ष सादिक शेख, उपाध्यक्ष समसुद्दीन शेख, मुंबई सेक्रेटरी सुलतान सिद्दीकी, जॉइंट सेक्रेटरी मुंबई शाहबाज शेख, मुंबई सल्लागार सरफराज सिद्दीकी, लतिफ शेख, मुंबई समन्वयक मुजीब अन्सारी, इब्राहिम शेख, मा. फिरोज शेख अध्यक्ष अंधेरी तालुका रिपब्लिकन सेना व टीम जमीर खान, शमशेर अन्सारी, इस्माईल शेख, सैफ खान, वसीम शेख, साहिल शेख तसेच रोहित प्रकाश खंडागळे युवा नेते रिपब्लिकन सेना व टीम मा. सुनिल तेली नेते मातंग समुदाय,समीर खोत नेते मातगड मुस्लिम समुदाय, सुनिल गायकवाड अध्यक्ष वॉर्ड क्र. 75, रिपब्लिकन सेना व टीम एकनाथ देसाई , दिनेश रोकडे, राज कांबळे, चेतन गायकवाड, आदित्य कांबळे, विकास कवळे, अमोद यादव, दत्ता एकरुपे, राजु जैन, अनिल सखारे, अमर मोहिते, सुरेश वाल्मीकी, राकेश काटकर, सुरज नोहार, नरेश अहिरे, अण्णा दुराई तमील सेना कार्यकर्ता, सलीम शेख उपाध्यक्ष मुंबई प्रदेश कमेटी रिपब्लिकन सेना, अरुण सोनावणे अध्यक्ष घाटकोपर पश्चिम रिपब्लिकन सेना, राजाराम टोके पत्रकार विभाग, युसुफ मेहबूब शेख रिपब्लिकन सेना जिल्हा अध्यक्ष मुंबई उपाध्यक्ष संगाता माने - शितोळे वंचित मा. उपाध्यक्षा, सायना सय्यद शिवसेना महाराष्ट्र उपाध्यक्षा, खैरुनिशा रिपब्लिकन सेना तालुका महासचिव, चेतना मगर शिवडी विधानसभा समाजसेविका, दिलीप रामचंद्र शेजवळ वंचित बहुजन आघाडी उत्तर पश्चिम जिल्हा अध्यक्ष आणि त्यांची टीम, अनवर शेख खान अंबोली विधानसभा मुंबई, मोईनुद्दीन हुसेन शेख कार्यकर्ता वंचित, बशिर इब्राहिम, शेख कार्यकर्ता वंचित, अंधेरी पश्चिम 61 वॉर्ड उपाध्यक्ष रोशन अन्सारी वर्धा विधानसभा वार्ड अध्यक्षा समाजसेविका, ज्योती यादव रिपब्लिकन सेना मुंबई संघटक आणि त्यांची टीम निविदीता शेलार वॉर्ड क्र. 147 रिपब्लिकन सेना अध्यक्ष, पुष्पा भल्लाल अंधेरी पूर्व रिपब्लिकन सेना अध्यक्ष, रोहिणी शिरपूरकर गोरेगांव, नंदिनी शेलार विरार, वंदना जाधव भांडुप, स्मिता गौरव ठाणे, रजनी विश्वकर्मा घाटकोपर, दिव्या बल्लाळ गोरेगांव, आशा कसबे चेंबुर, छाया पगारे घाटकोपर, रोशनी पाठक मीरा रोड, रागिणी संगारे गोरेगांव आदी अनेक मान्यंवर उपस्थित होते.

## संपादकीय

### एप्रिलातील ‘फूल’!

एप्रिल महिन्याची केवळ पहिलीच तारीख नव्हे; तर अन्य दिवसही अनेकांतील शहाणपणाच्या अभावाचे प्रदर्शन घडवतात. सुमारे ६५ वर्षांपूर्वी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांना याच महिन्यात अवदसा आठवली आणि शेजारील क्युबा या देशात आपण सैन्य पाठवून सत्ताबदल घडवण्याची इच्छा निर्माण झाली. त्याआधी त्यांचे पूर्वसुरी जनरल ड्वाईट आयसेनहॉवर यांनी असे करता येऊ शकते असे छातीठोकपणे सांगितले होते. तो शीतयुद्धाचा तप्त काळ. त्यामुळे क्युबा देशातील फिडेल कॅस्ट्रो यांचे सत्तापदी असणे अमेरिकेच्या डोळ्यात खुपत होते. त्यात वर आपण काहीही करू शकतो असा भ्रम. त्यातूनच केनेडी यांनी क्युबात पॅराट्रूपर्स घुसवले. पण तीन दिवसांतच त्यांना आपल्या चुकीची जाणीव झाली. क्युबात सत्ताबदल राहिला बाजूला, केनेडी यांस अमेरिकेची अब्रू वाचवत माघार घ्यावी लागली. इतिहासात नोंदले गेलेले ‘बे ऑफ पिग्ज’ प्रकरण ते हेच. स्वदेशीच्या या इतिहासातून अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही धडा घेतला नाही. म्हणून तो त्यांना आता याच महिन्यात इराण या देशाकडून शिकावा लागला. इराणशी सुरू असलेल्या शस्त्रसंधीची मुदत त्यांनी ऐन वेळी वाढवली. ही अशी तिसरी मुदतवाढ. आधीच्या दोन घटनांप्रमाणे मुदत संपण्यास काही तासांचा अवधी उरलेला असताना त्यांनी हा शस्त्रसंधी आपण वाढवत असल्याचे जाहीर केले. अगदी त्याआधी आपण असे काही अजिबात करणार नाही असे स्पष्ट करत इराणला घाबरवू पाहणाऱ्या ट्रम्प यांना स्वत:च ही मर्दुमकी गुंडाळून ठेवावी लागली आणि हा युद्धविराम तात्पुरता वाढवावा लागला.

ही ट्रम्प यांची असहायता. ती इराणने पूर्णपणे हेरली असून अमेरिकेच्या दबावास अजिबात न जुमानता ताठ उभे राहून अमेरिकेचा घाम काढण्याचा त्यांचा इरादा त्यातून स्पष्ट दिसतो. आपण होर्मुझची खाडी ताब्यात घेऊ, इराणचे अणुइंधन परत घेऊ, त्या देशाची राखरांगोळी करू इत्यादी वल्गनांनंतर ट्रम्प यांना एक प्रकारे इराणसमोर नांगी टाकावी लागली. खरे तर त्यात अजिबात आश्चर्य नाही. हे असेच होणार होते. ‘लोकसत्ता’ने गेल्या महिन्याभरातील विविध संपादकीयांतून इराण म्हणजे व्हेनेझुएला नव्हे, हा देश ट्रम्प यांच्यासमोर अजिबात शरणागती पत्करणार नाही, उलट ट्रम्प यांच्याच नाकीनऊ आणेल असे म्हटले होते. तसेच होताना दिसते. ते तसे होईल याच्या खुणा खरे तर सर्वत्र दिसत होत्या. स्वत:च्या मदमस्तीत गुंग ट्रम्प यांना त्या दिसल्या नाहीत. परिणामी त्यांच्यावर हे असे हसे करून घेण्याची वेळ आली. अमेरिकेने आमच्या जहाजांची केलेले नौदल-नाकेबंदी दूर होत नाही, तोपर्यंत आम्ही अमेरिकेशी चर्चाच करणार नाही, अशी स्वच्छ भूमिका इराणने घेतली. इतकेच नव्हे तर ती आजतागायत टिकवून ठेवली. इराणने ते तसे केले नसते, म्हणजे अमेरिकेच्या दबावास बळी पडून पाकिस्तानातील चर्चेत सहभाग घेतला असता तर ती एक प्रकारे शरणागती ठरली असती. निदान तसे मानले गेले असते. इराणने ते अजिबात होऊ दिले नाही. त्यांनी अमेरिकेस आणखी ताणण्याचा निर्णय घेतला. एरवीच्या शहाणपणात तुटेपर्यंत ताणू नये असे सांगितले जाते. इराण बरोब्बर याच्या उलट करताना दिसतो. असे केल्याने जो काही संवादधागा आहे तोही तुटेल याची जाणीव इराणला नसेल असे नाही. तरीही अशी ताठर भूमिका तो घेतो. याचे कारण असे केल्याने हा संवादसेतू खरोखरच तुटला तर त्याचा भौतिक फटका इराणला बसणार असला तरी झाल्या प्रकाराचा नैतिक झटका हा फक्त आणि फक्त अमेरिकेलाच बसणार, हे स्वच्छ आहे.

कारण इराणकडे आता गमावण्यासारखे काही नाही. अमेरिकेने नव्याने हवाई हल्ले केल्यास आणखी काही पूल, इमारती, धरणे, वीज प्रकल्प इत्यादी जमीनदोस्त होतील आणि काही शेकड्यांचे प्राण जातील. ते तसेही गेलेले आहेत आणि स्थावर मालमत्ताही उद्ध्वस्त झालेल्या आहेत. तेव्हा अमेरिका आणखी करून काय करणार, असा हिशेब इराणने केला नसेलच असे नाही.

## पालघर अनधिकृत फटाका कारखाना स्फोट प्रकरण

# विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची घटनास्थळी पाहणी, जखमींची भेट घेत दिला आधार

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर :** पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील कोनसाई गावात अनधिकृत फटाका कारखान्यात मंगळवारी (दि. २१ एप्रिल)रोजी भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत दोन कामगाराचा मृत्यू झाला असून काही जण गंभीर जखमी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कोनसाई येथील घटनास्थळाला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी स्फोटग्रस्त भागाचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.



यानंतर त्यांनी वाडा येथील शासकीय रुग्णालयात जाऊन जखमी कामगारांची विचारपूस केली. रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. तसेच त्यांना मदत देखील त्यांनी दिली. या दुर्घटनेतील पीडितांना मदत शासनस्तरावरून मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले. तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना यासंदर्भात निवेदन देण्यात येणार असल्याचे सांगितले.

यादरम्यान, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पोलीस, महसूल, कामगार अधिकारी यांच्यासोबत बैठक घेत सविस्तरपणे चर्चा केली, त्याबाबत पत्रकार परिषदेत माहिती दिली.

यावेळी त्यांनी सांगितले की, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय विभागाने अधिकृत कारखान्यांची यादी जाहीर करावी आणि तिची पडताळणी पोलीस पाटील व ग्रामसेवकांनी नियमितपणे करावी. ग्रामसेवक अनुपस्थित असल्यास ही जबाबदारी पोलीस पाटलांनी पार पाडावी. तसेच जिथे पोलीस पाटील नसतील, तिथे पोलिस निरीक्षकांनी जबाबदारी पार पाडावी.

दहा पेक्षा अधिक कामगार असलेल्या ठिकाणी कामगार कायदे काटेकोरपणे लागू करणे आवश्यक असून महसूल, ग्रामविकास, कामगार आणि औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय विभागांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रत्येक कारखान्यात सुरक्षा उपाययोजना अनिवार्य करून ‘फायर रक्षक’ नेमण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

कामगारांच्या सुरक्षिततेसाठी ‘सुरक्षिततेचा औद्योगिक आराखडा’ तयार करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. तसेच कामगारांच्या शोषणाच्या तक्रारी ग्रामविकास विभागाने नोंदवाव्यात, अशी सूचनाही संबंधित विभागाला देण्यात येणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. या सर्व बाबींचा अहवाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर करण्यात येणार असून शासन पातळीवर याबाबत पाठपुरावा केला जाणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार मृत कामगार भावेश वावरे यांच्या कुटुंबीयांना मदत देण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील आरोपीला जामीन मिळू नये आणि त्याला कठोर शिक्षा व्हावी यासाठी सक्षम सरकारी वकिलांची नेमणूक करण्याचे निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी पोलीस उपअधीक्षकांना दिल्या आहेत.

यावेळी भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी समीर मेहेर, पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे, वाडा-विक्रमगड प्रांतअधिकारी डॉ. संदीप चव्हाण, वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, पंचायत समिती गट विकास अधिकारी सुनील गवारी, कामगार विभागाचे अजित मोहिते, ग्रामसेविका वैभवी भोईर, सरपंच कैलास टोके, उपसरपंच निलेश मोकाशी, शिवसेना जिल्हा महिला संघटक वैदेही वाढान, शिवसेना तालुका संघटक रेश्मा पाटील, शिवसेना युवती सेना मनाली पाटील, शिवसेना उपजिल्हा प्रमुख सुनील पाटील, शिवसेना तालुका प्रमुख निलेश पाटील, शिवसेना शहर प्रमुख राजेंद्र पाटील, शिवसेना उपजिल्हा प्रमुख सुनील पाटील, वाडा नगरसेवक अजिंक्य पाटील व उमेश लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## “उभं राहायला थांबा आहे पण जगायला सन्मान नाही!” — बसथांबा शेडसाठी शहर-ग्रामीण जनतेची आर्त हाक

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) महाराष्ट्र :** विकासाच्या गाजावाजात हरवलेला एक साधा प्रश्न आज पुन्हा मनाला चटका लावतो—बसची वाट पाहणाऱ्या माणसाला डोक्यावर छप्पर का नाही? स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही शहर असो वा खेडं, सामान्य माणूस आजही उन्हात जळतो, पावसात भिजतो आणि वाऱ्यात थरथरतो… फक्त बस पकडण्यासाठी!ग्रामीण भागात तर हे चित्र अंगावर येणारं आहे. शाळेच्या वेळेत लहान मुलं रस्त्याच्या कडेला उभी, डोळ्यांत भीती आणि अपेक्षा; आई-बहीणी ओल्या साड्यांमध्ये, हातात पिशव्या सांभाळत बसची वाट पाहताना; तर ज्येष्ठ नागरिक काठीच्या आधाराने उभे—ना बसायला जागा, ना आसरा. झाडाची सावलीच त्यांचा ‘बसथांबा’ बनली आहे.शहरात चित्र थोडं वेगळं, पण वेदना तीच. उभे असलेले बसशेड अनेक ठिकाणी मोडकळीस आलेले—फुटके बाक, अंधारलेले कोपरे, ना पाण्याची सोय, ना स्वच्छतागृह. प्रवाशांचा थांबा जणू विस्मृतीत गेलेला… विकासाच्या नकाशावर असूनही प्रत्यक्षात मात्र अदृश्य!या अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाला आवाज देत धडाकेबाज युवा प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष श्री.अमोल धनराज केंद्रे यांनी आज शासनाच्या दारात ठामपणे हाक दिली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र




फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन सादर करून सामान्य नागरिकांच्या वेदना मांडल्या.“बसथांबा हा केवळ प्रवासाचा भाग नाही, तर तो माणसाच्या जगण्याचा सन्मान आहे. जिथे नागरिक तासन्तास उभा असतो, तिथे त्याला किमान संरक्षण आणि सुविधा मिळायलाच हव्यात,” असा भावनिक सूर या निवेदनातून उमटला.बीड जिल्ह्यातून या उपक्रमाची तातडीने सुरुवात करून संपूर्ण महाराष्ट्रात बसथांबा शेड, लाईट, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृह या मूलभूत सुविधा उभाराव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.आज प्रश्न फक्त एका थांब्याचा नाही… तो प्रत्येक त्या माणसाचा आहे, जो रोज जगण्यासाठी घराबाहेर पडतो आणि प्रवासाच्या सुरुवातीलाच अपमान सहन करतो. आता तरी शासनाने या आर्त हाकेला प्रतिसाद देत ठोस पावले उचलावीत—हीच सामान्य जनतेची मूक, पण तीव्र अपेक्षा आहे.

## संगीत ही केवळ कला नसून ती एक साधना आहे डॉ.चंद्रसेन कोठावळे



महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे**

**पाचोड :** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ‘जागतिक ध्वनी दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाला प्रसिद्ध गायक संजय चांदणे तसेच डॉ. चंद्रकांत जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.या प्रसंगी महाविद्यालयात ‘संगीत मैफिल’ आयोजित करण्यात आली होती. या मैफिलीमध्ये गायक संजय चांदणे यांनी अभंग, गवळण, भक्तीगीते आणि भावगीते यांचे सुमधुर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या गायनाने संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले होते.कार्यक्रमादरम्यान डॉ. चंद्रकांत जोगदंड यांनी संगीत क्षेत्राचे महत्त्व आणि त्यातील विविध पैलूंविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठीही उपयुक्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी समारोप करताना सांगितले की, “संगीत ही एक साधना आहे. त्यातून मानवाच्या मनाला चैतन्य प्राप्त होते. काही क्षणांसाठी का होईना, मनुष्य आपल्या दुःखांचा विसर पडतो. संगीत ही एक प्रभावी मानसिक उपचार पद्धती आहे.”कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले, तर आभार डॉ. संतोष चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. उत्तम जाधव, प्रा. विनोद कांबळे, प्रा. सचिन कदम, वैभव राऊत श्रीकांत चिंचखेडे मुरलीधर जिने मनोज राक्षे यांसह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अ-ब-क-ड उपवर्गीकरणाविरोधात रिपाइंने व आंबेडकरी जनतेनी आमदारांना निवेदन द्यावी - रिपाइं संपर्कप्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव

महाराष्ट्र जीत

**बुलडाणा,(प्रतिनिधी)-** बुलढाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ आठवले गटाच्या वतीने जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव यांनी रिपाइं कार्यकर्त्यांना व आंबेडकरी जनतेंला प्रसिद्धी पत्रका व्दारे विनंती वजा आवाहन केले आहे की, महाराष्ट्रातील सर्व बौद्ध बांधवांनी अनुसूचित जमातींच्या आरक्षणाच्या अ-ब-क-ड उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला ठाम विरोध नोंदवीने ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमिवर,प्रत्येकांने आपल्या-आपल्या मतदारसंघातील आमदारांना निवेदन देऊन आपली भूमिका स्पष्ट करावी. आरक्षण हे सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन असून त्याचे तुकडीकरण केल्यास समाजात फूट पडण्याची शक्यता निर्माण होईल. म्हणूनच एकत्रित आरक्षण व्यवस्था कायम ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकजूटीने पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे.

तमाम आंबेडकरी चळवळीत तसेच बौध्द बांधवांनी व रिपाई आठवलेंच्या पदाधिकारी यांनी स्थानिक आमदारांना भेटून लेखी उपवर्गीकरणाविरोधात निवेदने द्यावीत. तसेच आपल्या परिसरातील बांधवांना याबाबत जागरूक करावे संघटितपणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या लोकशाहीच्या पध्दतीने आपला विरोध नोंदवावा ही केवळ एका समाजाची मागणी नव्हे, तर समाजातील एकात्मता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना टिकवण्याची लढाई आहे.

आपल्या सक्रीय सहभागातूनच हा प्रश्न प्रभावीपणे मांडता येईल असे आवाहन समाजभूषण ज्येष्ठ नेते प्रा.इंजि. भैयासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार, महीलाध्यक्षा वंदनाताई वाघ, जिल्हाअल्पसंख्याक प्रमुख नबाब मिर्झा, युवाजिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील (म्हस्के), विदर्भमहीलाउपाध्यक्षा आशाताई वानखडे, विदर्भउपाध्यक्ष संजयजी वाकोडे, रामेश्वर वाकोडे, भाऊसाहेब वानखडे, विदर्भसचिव दलितमित्र विजयराज सपकाळ, जिल्हा संपर्क संघटक इंजि.शरद खरात,कार्यध्यक्ष प्रा. मुक्तार पठाण व सर्वतालुखाध्यक्ष यांनी केले आहे.

## नव्या काळाचा नव्या युगाचा नव्या पिढीचा नव्या दमाचा शाहिरी जलसा .

### वैचारिक प्रबोधनाच्या या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहा :- राहुल भाऊ काळे

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या देवळाली कॅम्प या पवित्र नगरीत गेल्या अनेक वर्षापासून धम्म रत्न मंडळ व आर के ग्रुप च्या वतीने बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करत असताना नवीन पिढीस व आंबेडकर अनुयायास महापुरुषांच्या कार्याची जाण व फुले शाहू आंबेडकरांचे विचारधारा रुजवण्याचे काम या मंडळाच्या वतीने करण्यात येते . सर्व धर्म समभाव या पद्धतीने सर्वांना सोबत घेऊन अनेक महा गायकांना देवळाली कॅम्प येथे आणून भव्य दिव्य स्वरूपामध्ये प्रबोधनात्मक जयंती साजरी करण्यामध्ये राहुल काळे यांचे नावलौकिक आहे बाबासाहेबांची जयंती असेल भव्य रथ मिरवणूक असेल अन्नदानाचा कार्यक्रम असेल किंवा प्रबोधनाचा यामध्ये राहुल काळे यांची देवळाली नव्हे तर संपूर्ण नाशिक जिल्ह्यामध्ये डॉ.बाबासाहेब




आंबेडकरांच्या जयंतीची चर्चा होत असते यावर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करत नवयाण महाजलसा नव्या काळाचा नव्या युगाचा नव्या पिढीचा नव्या दमाचा शाहिरी जलसा महाराष्ट्राच्या लोकप्रिय व ख्यातनाम शाहीर शीतल साठे, शाहीर सचिन माळी सहकलावंतासह यांच्या माध्यमातून तसेच फिल्म झुंड फेम गायक ( रॅपर ) विपिन तातडं देवळालीकरांना प्रबोधनात्मक पर्वणीचा आनंद घेता येणार आहे याकरिता पंचक्रोशीतील सर्व जाती-धर्माचे व आंबेडकर अनुयायी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान धम्म रत्न मित्र मंडळ व आर के ग्रुपच्या वतीने करण्यात शुक्रवार दिनांक 24 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 6.00 वाजता ठिकाण जुने बस स्टॅन्ड देवळाली कॅम्प येथे होणार आहे तमाम भीमसैनिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राहुल भाऊ काळे व त्यांच्या सहकार्याच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# तिसऱ्या दिवशीही सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्याचा संप सुरूच

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर वाडा :** दीर्घकालीन प्रलंबित असलेल्या मागण्यासाठी सरकारी व निमसरकारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा 21एप्रिल पासून बेमुदत संपावर गेले असून तिसऱ्या दिवशीही हा संप सुरु आहे

वाडा तालुक्यातील तहसील कार्यालयातील कर्मचारी संपात सहभागी असल्याने महसूल विभागाचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. शासनाकडे वारंवार मागण्या करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने अखेर संपाचे हत्यार उचलावे लागल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांच्या दीर्घकालीन प्रलंबित असलेल्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत

१)सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी.

२)सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत समस्यांवर मा.मुख्यमंत्री

स्तरावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी, दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात यावे.

३) दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा.

४) चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा.

१०:२०:३० वर्षांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा.

५)राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीचा सन २००५ पासूनचा




आकृतीबंध तयार करण्यात यावा.तसेच पूर्वाश्रमिच्या ग्रामपंचायतीमधील

कायम असलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे.

६) सर्व सरकारी कर्मचारी निवृत्तीवेतनधारक / कंत्राटी रोजंदारी कर्मचारी यांना सर्व महत्वाच्या इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी

व्यापकस्वास्थ्य विमा योजना लागू करावी.

७) सेवानिवृत्तीचे वय ६० करा.

८) १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी रोजंदारी / अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा.

९)एकवेळची बाब म्हणून प्रतिक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या द्या.

१०)अनेक विभागात लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रदिर्घ काळ कार्यात्मक उच्च पदाच्या पदोन्नतीपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अपेक्षित

वेतन वृध्दीचा लाभ संबंधितांना मिळत नाही. याबाबत सुधारित धोरण करण्यात यावे

११) "पीएफआरडीए" कायदा रद्द करण्यात यावा व फंड मॅनेजरकडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी.

१२) सरकारी कर्मचाऱ्यांवर कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हिंसक हल्ल्याविरुध्द कडक कारवाई व्हावी यासाठी आयपीसी कलम ३५३

मध्ये दरुस्ती करुन कलम ३५३ अजामिनपात्र करण्यात यावे.

१३) सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्या संदर्भातील कार्यवाहीचा वेग वाढवावा.

१४) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील १९८१ च्या शासन निर्णयाची पुनथापना करा.

१५)ज्या विभागाने सेवाभरती नियम व आकृतीबंधास अद्यापशासन मंजुरी घेतलेली नाही,त्यांना अशी मंजुरी विहित मुदतीत घेण्यासंदर्भात सूचना

देण्यात याव्यात.

१६)शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात यावा.

१७) नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा.

अशा विविध मागण्यासाठी कर्मचारी संपावर गेलेले आहेत या संपामध्ये राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ तसेच महाराष्ट्र राज्य गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ इ. संघटना सहभागी झालेल्या आहेत.

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्र प्रकरणात २.५० लाखांची लाच स्वीकारताना उपसंचालक रंगेहात अटकेत?

महाराष्ट्र जीत

**भिवंडी, (सुनील झळके) :** अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणात प्रकरण मार्गी लावून देण्यासाठी २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना कोकण विभाग ठाणे येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील उपसंचालक (संशोधन) तथा सहआयुक्त व उपाध्यक्ष मीनाक्षी नारायण उन्हाळे (वय ४६) याना लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या (ACB) पथकाने रंगेहात अटक केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ५४ वर्षीय तक्रारदार यांनी आपल्या पत्नी व मुलीच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीची फाईल मंजूर करून देण्यासाठी आरोपी अधिकारी उन्हाळे हिने २.५० लाख रुपयांची मागणी केल्याची तक्रार १२ फेब्रुवारी २०२६ रोजी ACB रायगड युनिटकडे केली होती. त्यानंतर १३ फेब्रुवारी



रोजी करण्यात आलेल्या पडताळणीत लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर १३ मार्च २०२६ रोजी सापळा रचण्यात आला. ठाण्यातील संबंधित कार्यालयातील स्वतःच्या केबिनमध्ये आरोपी उन्हाळे या तक्रारदाराकडून २.५० लाख रुपयांची लाच स्वीकारताना सायंकाळी ४.१० वाजता ACB पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

कारवाईदरम्यान आरोपीकडून लाचेची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली असून संबंधित कागदपत्रेही ताब्यात घेण्यात आली आहेत. तसेच आरोपीचा मोबाईल फोन तपासासाठी जप्त करण्यात आला आहे. त्यांच्या राहत्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले (ACB, रायगड) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास पोलीस निरीक्षक निशांत धनवडे करत आहेत. या कारवाईवर पोलीस अधीक्षक शिवराज पाटील तसेच अप्पर पोलीस अधीक्षक भागवत सोनावणे व सुहास शिंदे यांचे पर्यवेक्षण होते.

## वाशिम येथे जिल्हा कार्यालय मंडळाचा वर्धापन दिन साजरा

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** आज दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी जिल्हा कार्यालय वाशिम येथे मंडळाचा 66 वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला महात्मा गांधीजींची तसेच महात्मा ज्योतिबा फुले, श्री. वि. स. पागे, रोजगार हमी योजना जनक यांच्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करण्यात आले या प्रसंगी मंडळाचे जिल्हा समितीचे माजी अध्यक्ष श्री. बालाजी वानखडे (पाटील ), डॉ. अंगद राऊत, अध्यक्ष, एम. आय. डी. सी. वाशिम, डॉ. सौं. कविता दागडिया, प्रतिष्ठित



महिला, श्री. कृष्णा चौधरी, उद्योजक व अध्यक्ष, जिल्हा मेडिसिन संघटना, वाशिम, श्री. जिवन बोथीकर, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, वाशिम व कर्मचारी श्री.दिगंबरं लोखंडे ,श्री. एन यू. चव्हाण,श्रीमती. वनिता राठोड,श्री.अनिकेत राठोड, श्री. रमेश इडोळे, श्री. गणेश इढोळे, श्री. सुमित सत्तारके,कु. अपेक्षा बगाडे, उपस्थित होते.

## काजळेश्वरच्या सविता बावने यांना पंतप्रधान जीवन ज्योती विमा अंतर्गत दोन लाख रुपयाचा लाभ

### दि अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा काजळेश्वर ची तत्परत

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:**दि अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती बॅंक शाखा काजळेश्वर येथील सभासद महादेव वामनराव बावणे यांचे निधन झाले . त्यांच्या पश्चात वारस असलेल्या त्यांची पत्नी श्रीमती सविता महादेव बावणे यांना दोन लाख रुपयाचा धनादेश बॅंक संचालक विश्वनाथ पाटील ताथोड यांच्या हस्ते दि .




२३ एप्रील रोजी देण्यात आला . महादेव बाबने यांना बॅंकेमार्फत पंतप्रधान जीवन ज्योती विम्याचे कवच होते . बॅंकेचे शाखाधीकारी योगेश अनासने यांनी त्यांचा विमा प्रस्ताव तयार करुन मुख्य बॅंक कार्यालयाकडे पाठवला त्यानुसार वारस असलेल्या श्रीमती सविता महादेव बावने यांना दोन लाख रुपयाचा लाभ गुरुवारी धनादेशा द्वारे बॅंकेचे संचालक विश्वनाथ पाटील ताथोड यांचे हस्ते देण्यात आला . यावेळी सोसायटी अध्यक्ष सुभाष उपाध्ये ;उपाध्यक्ष मुजिक्कीरभाई ;संदीप पाटील उपाध्ये; केशव उपाध्ये; हर्षल उपाध्ये; बॅंक प्रतीनीधी रामेश्वर गावंडे ; मुख्याध्याकारी बलदेव सिंग राठोड; अजय पदमने; विशाल इंगळे; शाखाधीकारी योगेश अनासने ;कडू साहेब ; उमेश निंबेकर ; रामदास बावने यांची प्रामुख्याने उपस्थिती होती .

## संजय गांधी,श्रावण बाळ, दिव्यांग लाभार्थी यांना दिलेल्या नोटीस थांबवा ; जिल्हाधिकारी यांना निवेदन

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रविण पट्टेबहादुर) :** शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबवल्या जातात. यामध्ये संजय गांधी निराधार योजना श्रावणबाळ योजना दिव्यांग बांधवांसाठी योजना राबविल्या जातात. मात्र आता या योजनेच्या अंतर्गत असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना तहसील कार्यालय मार्फत आलेल्या नोटीस व कार्यवाही तात्काळ थांबण्यासाठी जिल्हाधिकारी साहेब यांना शिवसेनेच्या वतीने निवेदन दिले




संपूर्ण वाशिम जिल्ह्यामधील संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे दिव्यांग असलेले लाभार्थी खूप मोठ्या प्रमाणात आहेत. दिव्यांग बांधवांना अनुदान मिळत असते शासनाचा हाच एक आधार असून त्या आधारावरच सरकारने कडक निर्बंध लादले असून दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येक तहसील मार्फत नोटीस पाठवलेले आहेत.त्यामुळे दिव्यांग बांधव हातबल झाले असून आता दाद मागायची तर कुणाकडे आणि आयुष्य जगायचे तरी कसे असा यक्षप्रश्न त्यांच्यापुढे आ वासून उभा राहिलेला आहे. शासनाच्या पोर्टलवर प्रत्येक दिव्यांग बांधवांनी UDID कार्ड ची केवायसी केली असून त्यांना सध्या तात्पुरत्या स्वरूपाचे अपंग प्रमाणपत्र मिळालेले आहेत ते प्रमाणपत्र कायमस्वरूपी करण्यासाठी मुदत संपलेली नसल्यामुळे पोर्टलवर ऑनलाईन घेत नाही.त्यामुळे दिव्यांग बांधव शासकीय अनुदानापासून वंचित राहू शकतात त्यामुळे शासनाने लवकरात लवकर या पोर्टलमध्ये सुधारणा करून दिव्यांग बांधव अनुदानापासून वंचित राहणार नाहीत याची काळजी घ्यावी व शासन निर्णय क्रमांक विसयो -2025/ प्र. क्र.92/ विसयो दि 27/03/2026 चा जीआर तात्काळ रद्द करून दिव्यांग बांधवांना न्याय द्यावा ही विनंती अन्यथा येत्या सात दिवसात संपूर्ण वाशिम जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे भव्य मोर्चा काढण्यात येईल अशा प्रकारचे निवेदन रिसोड तालुका उपप्रमुख गजानन देशमुख व युवा सेना संपर्क प्रमुख श्री गोरख पाटील बोरकर यांनी उपजिल्हाधिकारी साहेब , दिव्यांग कल्याण मंत्रालय मुंबई , माननीय श्री प्रकाश आंबेडकर साहेब आरोग्य विभाग मंत्री आणि आमच्या नेत्या तथा अपराजित खासदार विदर्भ कन्या, विधान परिषद आमदार भावनाताई गवळी यांना दिले आहेत.

## आबलोलीच्या सरपंच सौ .वैष्णवी वैभव नेटके राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित,भारत सन्मान पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सत्कार

महाराष्ट्र जीत

**कल्याण (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** गुहागर तालुक्यातील आबलोली या ग्रामीण भागात शासनाच्या योजना आणून आपल्या विभागाचा सार्वांगिण विकास करणे हा ध्यास, आपल्या विभागातील जनतेला सुखसोयी उपलब्ध करून देणे, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याची मोहोर उमटवणाऱ्या आबलोलीच्या सरपंच सौ.वैष्णवी वैभव नेटके.त्यांच्या या चतुरस्त्र कार्याची दखल इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन(अँन्टी पायरेसी सेल) मुंबई या संस्थेने घेतली.कल्याण येथील के.एम. अग्रवाल कॉलेज एसी ऑडिटेरियम भारत सन्मान पुरस्कार सोहळ्यात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सौ.वैष्णवी वैभव नेटके यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ जीवन गौरव




पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार प्रमुख पाहुण्या इंडियन एअर फोर्सच्या फ्लाइंग ऑफिसर इतिशा चौहान आणि अभिनेत्री ए-स्टार टूर्स अँन्ड ट्रॅव्हल्स च्या संस्थापिका अश्विनी अमित चुरी यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.वैष्णवी नेटके यांनी सरपंच म्हणून यशस्वीपणे कारकीर्द गाजवली आहे, अजूनही कार्यरत आहेत.त्यांच्या या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना,सरकारमान्य, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, विविध संस्थांकडून पुरस्कार प्राप्त झाले आहेत.कल्याण येथील या पुरस्कार सोहळ्यात सौ.वैष्णवी नेटके यांचे कुटुंबीयही सहभागी झाले होते. आबलोली सरपंच तसेच सामाजिक कार्यकर्ती म्हणून सौं.वैष्णवी नेटके सर्वत्र पंचक्रोशीत परिचित आहेत. सौ.वैष्णवी नेटके यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# बँक संचालक विश्वनाथ पाटील ताथोड यांचा काजळेश्वरात सन्मान



महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:** दि अकोला वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निर्वाचित संचालक विश्वनाथ पाटील ताथोड यांनी काजळेश्वर सेवा सहकारी सोसायटी व जिल्हा सहकारी बँकेला दि . २३ एप्रील रोजी दुपारी भेट दिली . भेटीत त्यांनी सोसायटी व बँकेचे कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले .

यावेळी सेवा सहकारी संस्था व जील्हामध्यवर्ती बँक शाखा काजळेश्वरचे वतीने सोसायटी उपाध्यक्ष मुजक्कीर भाई शे . मुरसलीम व बँकेचे शाखाधीकारी योगेश अनासने यांनी नवनीर्वाचीत संचालक विश्वनाथ पाटील ताथोड यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देत सत्कार केला . बँकेच्या सुवीधा शेतकऱ्यांना विनाविलंब देण्याचे काम तत्परतेने केले जाईल असे यावेळी सत्काराला उत्तर देतांना विश्वनाथ पाटील म्हणाले . यावेळी बँक प्रतीनीधी रामेश्वर गावंडे ; सुभाष उपाध्ये; मुजक्कीर भाई; संदीप पाटील उपाध्ये; सुभाष पाटील उपाध्ये हर्षल उपाध्ये शाखाधिकारी योगेश अनासने; रोखपाल हेमंत कडू साहेब; बलदेव सिंग राठोड; अजय पदमने विशाल इंगळे; उमेश निंबेकर ;रामदास बावने'; केशव उपाध्ये इत्यादींची उपस्थीती होती .

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत साक्षी लबडेची उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** येथून जवळच असलेल्या ग्राम कोंडाळा झामरे या छोट्याशा गावातून सुरू झालेला साक्षी लबडेचा प्रवास आज जिद्द आणि मेहनतीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. साध्या शेतकरी कुटुंबात वाढलेल्या साक्षीने लहानपणापासूनच अनेक अडचणींचा सामना करत शिक्षणाची वाट निवडली. घरातील जबाबदाऱ्या, आर्थिक मर्यादा आणि मर्यादित साधनं या सगळ्यांवर मात करत तिने आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवले.अभ्यासात सातत्य ठेवत साक्षीने समाजकार्य क्षेत्राची निवड केली. बीएसडब्ल्यू शिक्षण घेत असतानाच तिने मुंबईतील टाटा सामाजिक विज्ञान संस्थान (TISS) मध्ये प्रवेश घेण्याचा निर्धार केला. महाविद्यालयीन शिक्षण, बार्टीचा अभ्यासक्रम आणि कौशल्य विकास वर्ग यांचा समतोल साधत तिने दिवस-रात्र परिश्रम घेतले. अखेर





तिच्या या प्रयत्नांना यश मिळाले आणि तिला TISS मध्ये प्रवेश मिळाला. मुंबईत शिक्षण सुरू झाल्यानंतरही तिचा संघर्ष कायम राहिला. आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी तिने शिष्यवृत्ती मिळवण्याचा ध्यास घेतला आणि सातत्यपूर्ण प्रयत्नातून व्हीएसएम शिष्यवृत्ती प्राप्त केली. भाषेची अडचण आणि नव्या वातावरणातील आव्हाने असूनही तिने अभ्यासात उत्कृष्ट कामगिरी टिकवून ठेवली.श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम येथून BSW पूर्ण केल्यानंतर साक्षीने



टीआयएसएसमधून एम.ए. समाजकार्य (महिला केंद्रित अभ्यास) ही पदव्युत्तर पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली. विशेष म्हणजे, सरनाईक महाविद्यालयातून TISS पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणारी ती पहिली विद्यार्थिनी ठरली आहे.शैक्षणिक प्रवासादरम्यान तिने वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात जाऊन अनुसूचित जाती व जमातीतील महिलांच्या नेतृत्वाचा सखोल अभ्यास केला. तिच्या या कामातून सामाजिक प्रश्नांविषयीची समज आणि बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते.याच काळात तिची अभिजीत सेन ग्रामीण इंटर्नशिप २०२४ साठी निवड झाली. तसेच टीआयएसएसच्या समाजकार्य शाळेतर्फे दिला जाणारा क्षेत्रीय कार्यातील उत्कृष्ट विद्यार्थी (समाजकार्य पदव्युत्तर) हा मानाचा पुरस्कार आणि एनटीपीसी सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. साक्षीचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यशापुरता मर्यादित नसून, तो ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेषतः मुलींसाठी प्रेरणादायी आहे. प्रतिकूल परिस्थितीतही सातत्य, परिश्रम आणि स्पष्ट ध्येय असेल, तर यश नक्की मिळते, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे.या यशाचे श्रेय साक्षी तिचे आईवडील, प्रा. मंगेश भुताडे, एकलव्य इंडिया फाउंडेशन (EIF) आणि TISS मधील तिच्या शिक्षकांना व या मार्गात सोबत असणार्यांना देते.तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कुटुंबीयांसह सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# दिवा स्टेशन परिसरात कायद्याची ऐशीतैशी! रात्री उशिरापर्यंत पानटपऱ्या सुरू;

## नशेखोरांचा राबता आणि वाढती गुन्हेगारी चिंतेचा विषय

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) ठाणे (दिवा):** ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा स्टेशन परिसर सध्या अवैध धंद्यांचे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे सुरक्षित आश्रयस्थान बनू पाहत आहे. रात्रीच्या वेळी जिथे सर्वसामान्य आणि प्रामाणिक व्यावसायिकांना आपली दुकाने ११ ते ११:३० च्या दरम्यान बंद करण्याची सक्ती केली जाते, तिथेच दुसरीकडे काही विशिष्ट पानटपऱ्या रात्री १:३० ते २:३० पर्यंत बिनदिक्कतपणे सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

नशेखोरांची वर्दळ आणि गुन्हेगारीचा विळखा या रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या टपऱ्या केवळ व्यवसाय करत नसून, त्या नशेखोरांचे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे मुख्य अड्डे बनल्या आहेत. प्रतिबंधित गुटखा, पानमसाला




आणि भांग गोळ्यांच्या उपलब्धतेमुळे येथे गर्दुल्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या नशेखोर आणि गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांमुळे स्टेशन परिसरात रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या महिला आणि सामान्य प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या वर्दळीतूनच वादावादी, हाणामारी आणि छेडछाडीसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असून, दिवा परिसराची शांतता धोक्यात आली आहे. प्रत्यक्ष पुराव्यानुसार, या पानटपऱ्यांवर सरकारतर्फे प्रतिबंधित असलेला गुटखा आणि भांग गोळ्यांसारख्या अंमली पदार्थांची राजरोसपणे विक्री केली जात आहे. तरुण पिढीला नशेच्या जाळ्यात ओढणारे हे साहित्य कोणत्याही भीतीशिवाय विकले जात असताना पोलीस प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन (FDA) नेमकी कोणाची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

एकीकडे कायद्याचे पालन करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांवर रात्री ११ नंतर कारवाईचा बडगा उगारला जातो. मग याच स्टेशन परिसरातील काही ठराविक टपऱ्यांवर पोलिसांची 'मेहरनजर' का? या टपऱ्यांच्या मालकांना कोणाचे अभय लाभले आहे? गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांशी या टपरी चालकांचे काय संबंध आहेत? यामागे मोठा आर्थिक व्यवहार तर नाही ना? 'पाणी कुठे मुरतंय?' अशा चर्चांना आता दिवा परिसरात उधाण आले आहे.

**नागरिकांची मागणी:**

"दिव्यातील वाढती गुन्हेगारी आणि अंमली पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी या पानटपऱ्यांवर तात्काळ धाड टाकून त्या कायमच्या बंद करण्यात याव्यात. पोलिसांनी सामान्य नागरिकांना त्रास देण्यापेक्षा या अवैध धंद्यांच्या आणि गुन्हेगारांच्या मुसक्या आवळाव्यात."आता पोलीस प्रशासन या गुन्हेगारी आणि नशेच्या व्यापारावर 'दमदार' कारवाई करून जनतेला दिलासा देणार की 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष सुरूच राहणार? याकडे संपूर्ण दिवेकरांचे लक्ष लागले आहे.

# लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे - डॉ.अनिल कावरखे



**कन्याभ्रूणहत्या ही केवळ कायद्याचा विषय नाही, तर ती सामाजिक चेतनेची गरज आहे. नागरिकांनी पुढाकार घेऊन अशा बेकायदेशीर कृत्यांची माहिती प्रशासनाला दिल्यास एका मुलीचा जीव वाचतो आणि समाजाचा दृष्टिकोन बदलतो. जिल्हा प्रशासन या मोहिमेला प्रभावीपणे राबविण्यास कटिबद्ध आहे.**

**जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर**

**कन्याभ्रूणहत्या थांबवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. बक्षीस योजनेद्वारे जनजागृती होऊन लिंगनिषेधास प्रतिबंध घालण्यास मदत होईल. प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही सहकार्य करावे.**

**_मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान**

**लिंग निवड चाचण्या आणि कन्याभ्रूणहत्या या गंभीर सामाजिक समस्या आहेत. वाशिम जिल्ह्यात राबविण्यात येणारी बक्षीस योजना ही स्त्री भ्रूणाच्या संरक्षणासाठी प्रभावी पाऊल आहे. नागरिकांनी अशा प्रकरणांची माहिती दिल्यास प्रशासन तातडीने कारवाई करेल.**

**जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे**

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** कन्याभृणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती दिली.आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित माहितीदारास रु. १ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात असून, तिचा उद्देश कन्याभृणहत्या थांबवणे, लिंग गुणोत्तर सुधारणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

आज दि.(१५) रोजी जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे,जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. अनिल कावरखे , ॲड. गोवर्धन गंगावणे ,डॉ .शिवनंदा आम्ले, डॉ.जया बिबेकर, डॉ.जे.एस.बाहेती, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया, डॉ उज्वला गिऱ्हे, डॉ. गोपाल हेंबाडे आदी उपस्थित होते.

गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्याअंतर्गत राबविलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्या नागरिकास एक लाख रुपये बक्षीस दिले जाईल. माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि संबंधिताची ओळख सुरक्षित राहील.नोंदणीसाठी https://amchimulgimaha.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.संपर्कासाठी: राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १०४, १८००२३३४४७५ वर संपर्क साधता येईल.

सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून या योजनेचा लाभ घ्या — तुमच्या माहितीद्वारे एका चिमुकल्या जीवाला जीवनदान मिळू शकते.

# आज पुणे मनपा शाळा, उत्तमनगर येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवव्याख्याते साहित्यरत्न डॉ. गणेश विठ्ठल राऊत यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. अमोल मिडगुले सर यांनी केले.

सुयोग्य नियोजनात झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शाळा व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत गौरवोद्गार काढले. आपल्या शालेय जीवनातील गोड आठवणींना उजाळा देताना अनेक विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले.

यावेळी शाळेचे उपशिक्षक श्री. दिपक तांबे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे, साहित्यरत्न डॉ. गणेश राऊत यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शंभुराजे आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श मानून जीवन घडवण्याचा मौलिक संदेश दिला. तसेच, आपल्या मातृभूमी व शाळेचे स्मरण सदैव ठेवावे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

कार्यक्रमप्रसंगी शालेय व्यवस्थापन







समितीच्या अध्यक्षा रागिनी जंगम, उपाध्यक्ष रंजना बनसोडे, शुभांगी शिंदे, सुमन कराडकर, उषा बडगे, पोर्णिमा माने हे सदस्य व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सिद्धेश्वर नागरगोजे यांनी केले, तर श्री. गोविंद लवांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# दारव्हा शहराबाहेरून बायपास रस्ता मंजूर करून बांधकाम करा – बहुजन मुक्ती पार्टीची मागणी

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे**

दारव्हा शहरातील यवतमाळ ते अकोला हा प्रमुख महामार्ग दारव्हा शहराच्या मध्यभागातून जातो. या मार्गावर श्री मुंगसाजी महाराज महाविद्यालय, आय.टी.आय. कॉलेज, उपजिल्हा रुग्णालय, टाकळी-डोल्हारी प्रकल्प कार्यालय, अडाण प्रकल्प कार्यालय, न्यायालय, बस स्थानक, गोळीबार चौक, पंचायत समिती कार्यालय, नगर परिषद शाळा क्र. ४, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, पोलीस उपविभागीय कार्यालय, नगर परिषद कार्यालय, विविध बँका, शाळा, पोस्ट ऑफिस तसेच कारंजा रोड व नेर रोडकडे जाणारे मार्ग अशा अनेक शासकीय व सार्वजनिक ठिकाणांचा समावेश आहे.

या परिसरात सतत मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. तथापि, या मार्गावरून मोठी व जड वाहने भरधाव वेगाने जात असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः मुंगसाजी कॉलेज परिसर, गोळीबार चौक व डोल्हारी-नेर रोड या ठिकाणी वारंवार अपघात घडत असून काही अपघातांमध्ये नागरिकांना जीव गमवावा लागला आहे.

तसेच, संबंधित महामार्गावर दारव्हा शहरात कुठेही प्रभावी स्पीड ब्रेकर किंवा वेग नियंत्रणाची व्यवस्था नसल्यामुळे वाहनांचा वेग कमी होत



नाही. परिणामी दारव्हा शहर अपघातप्रवण क्षेत्र बनत चालले आहे.

या गंभीर परिस्थितीचा विचार करता, मोठ्या वाहनांची शहरातील वाहतूक टाळण्यासाठी श्री मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या पाठीमागील भागातून नवीन रेल्वे स्टेशन मार्गाकडे जोडणारा बायपास रस्ता तातडीने मंजूर करून बांधण्यात यावा.

तसेच यवतमाळ ते अकोला या मार्गावर दारव्हा शहरासाठी स्वतंत्र बायपास रस्ता मंजूर केल्यास भविष्यातील अपघात मोठ्या प्रमाणात टाळता येतील व नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित होईल.

आपण सदर निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा नागरिकांसह बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल.अशा आशयाचे निवेदन बिमोद मुधाने यांच्या नेतृत्वात देण्यात आले. यावेळी प्रवीण खोडे पाटील, गुणवंत शेंदूरकर,रवि मनवर,रमेश ढगे, प्रशांत ठाणे उपस्थित होते.

# आदिनारीशक्ती फाउंडेशन अंतर्गत श्री स्वामी समर्थ व्यसनमुक्ती केंद्र उद्घाटन समारंभ संपन्न






महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** आदिनारीशक्ती फाउंडेशन अंतर्गत श्री स्वामी समर्थ व्यसनमुक्ती केंद्र रेठरे कारखाना उद्घाटन समारंभ माननीय सो. वैशाली साळुंखे सरपंच किल्ले मच्छिंद्रगड तसेच पंचायत समिती सदस्या ईश्वरपूर स्वाती संभाजी मदने व टायगर ग्रुप वाळवा तालुका अध्यक्ष , युवा ग्रामीण पत्रकार संघ सातारा, सांगली जिल्हा उपाध्यक्ष, झेप फाउंडेशन पुणे महाराष्ट्र राज्य वाळवा तालुका सचिव शरद निकम आणि सर्व ग्रामस्थ यांच्या हस्ते आज संपन्न झाला.